
# पंतप्रधान मोदी, योगी ॲग्रोव्हिजनला येणार

## गडकरी : २३ ते २६ नोव्हेंबर दरम्यान प्रदर्शन

**नागपूर, ता. २८ :** शेतीसंदर्भातील प्रगत तंत्रज्ञान आणि जोडधंद्याची माहिती देणारे मध्य भारतातील सर्वांत मोठे कृषी प्रदर्शन येत्या २३ ते २६ नोव्हेंबरदरम्यान रेशीमबाग मैदानावर भरविण्यात येणार आहे. यंदाच्या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची उपस्थिती राहणार आहे.



**नितीन गडकरी**

प्रदर्शनाच्या उद्घाटनाला पंतप्रधानांनी यावे, अशी विनंती करण्यात आली असून उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री व त्रिपुरा आणि आसामच्या मुख्यमंत्र्यांना निमंत्रित करण्यात आल्याची माहिती असल्याचे केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाच्या तयारीसाठी विदर्भातील प्रतिनिधींची बैठक

पान ६ वर »